# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वर्धा.

ACCESS TO JUSTICE FOR ALL

गजानन नंदनवार
प्रभारी सचिव

'विधी सेवा सदन'
जिल्हा व सत्र न्यायालय,
सिव्हील लाईन, वर्धा - ४४२ ००१
दुरध्वनी क्र. ०७१५२-२४५५९४
E-mail : dlsawardha@gmail.com

जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा
आवक क्र. ४३६५
दिनांक १३/५/२६

जावक क्रमांक ८३३ /२०२६
दि.१२/०५/२०२६

प्रति,

जिल्हा संगणक प्रणाली संचालक,
जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा.

विषय : कंत्राटी वाहनचालक पदाकरीता सुधारीत जाहिरात प्रकाशीत करण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून कंत्राटी वाहनचालक या पदाकरीता स्थापन करण्यात आलेल्या निवड समितीच्या आदेशान्वये कळविण्यात येते की, या आस्थापनेवर १ कंत्राटी वाहनचालक या पदाकरीता अर्ज मागविण्याबाबत सुधारीत सुचना/जाहिरात प्रकाशीत करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

या अनुषंगाने कंत्राटी वाहनचालक करीता अर्ज मागविण्याबाबतची सुधारीत सुचना/जाहिरात जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसारीत करण्यात यावे तसेच याबाबतचा अहवाल या प्राधिकरणास सादर करावे.

करीता पुढील कार्यवाहीस्तव सादर.

आपला,

१२/५/२६
प्रभारी सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वर्धा.

13-05-26

सोबत :. सुधारीत सुचना

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वर्धा.

'विधी सेवा सदन'
जिल्हा व सत्र न्यायालय,
सिव्हील लाईन, वर्धा - ४४२ ००१
दुरध्वनी क्र. ०७१५२-२४५५९४/ ८५९१९०३९३२
E-mail : wardha-dlsa.mh@bhc.gov.in

हेमंत भ. गायकवाड
अध्यक्ष

विवेक दा. देशमुख
सचिव

---

## दिनांक २८ एप्रिल, २०२६ रोजी प्रकाशीत करण्यात आलेल्या कंत्राटी वाहनचालकाची सुधारीत जाहिरातबाबतची सुचना

खालील अटी व शर्ती नुसार अर्ज सादर करण्याकरीता दिनांक १८ मे २०२६ सायं. ०५.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

अटी व शर्ती :-

१. उमेदवार कमीत कमी एस. एस.सी. (दहावी) किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असावा.

२. उमेदवारास मराठी व हिंदी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

३. उमेदवाराकडे जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास व त्यानंतर मोटार वाहन अधिनियम १९८८ (क्र. ५९/१९८८) प्रमाणे वैध व कार्यरत असा किमान हलके मोटार वाहन (LMV) चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसन्स) असावा.

४. वयोमर्यादा :- जाहिरात प्रसिध्दीच्या तारखेस उमेदवाराचे वय किमान २१ वर्ष व कमाल ३८ वर्ष असावे. मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्ष राहील.

५. कामाचा अनुभव :- उमेदवारास अर्ज करण्याच्या तारखेस किमान ३ वर्ष हलके आणि/ किंवा जड मोटार वाहन चालवण्याचा अनुभव असावा.

६. उमेदवाराचा वाहन चालविण्याचा पूर्व कार्यकाल (रेकॉर्ड) स्वच्छ असावा. तसेच त्याचेवर कोणताही फौजदारी गुन्हा नसावा.

७. उमेदवारास मोटार वाहनाची देखभाल व सर्वसाधारण दुरूस्तीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

८. उमेदवारास वर्धा जिल्हाची स्वाभाविक रचना (Topography) माहित असावी.

९. उमेदवार शारीरीकदृष्टया पात्र आसावा तसेच दृष्टी चांगली असणे आवश्यक राहील. त्याबाबतचे शासकीय रूग्णालय वर्धा येथिल वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१०. उमेदवार निर्व्यसनी असावा.

११. वाहनास अपघात झाल्यास दुर्देवाने वाहन चालकास गंभीर स्वरूपात इजा झाल्यास वाहन चालकास वैद्यकीय खर्चाची अथवा नुकसान भरपाईचे कोणतेही दायित्व शासनाकडे असणार नाही. त्याची संपूर्ण जबाबदारी स्वत:ची राहील.

१२. सदरचे पद हे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाचे असून फक्त ११ महिण्याच्या कालावधीसाठी कंत्राटी स्वरुपात भरण्यात येणार आहे. उमेदवाराचा या पदावर नोकरी कायम करण्याबाबत कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही.

१३. दिनांक १८ /०५/२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता पर्यंत महाराष्ट्र शासनाच्या महास्वयंम पोर्टलवर (https://rojgar.mahaswayam.gov.in/) वर्धा तालुक्यातील नोंदणीकृत उमेदवारानेच फक्त ऑनलाईन रित्याच अर्ज करावा. (या कार्यालयास प्रत्यक्षरित्या अर्ज केल्यास स्विकारल्या जाणार नाही.)

१४. शैक्षणिक पात्रतेबाबत व अनुभवाबाबत स्वयं साक्षांकित प्रती कागदपत्र पडताळणी वेळेच दाखल करावे लागेल.

१५. निवड करण्यात आलेल्या उमेदवाराने प्राधिकरणाकडे करारनामा लिहून देणे गरजेचे आहे.

१६. निवड प्रक्रिया रद्द करणे किंवा स्थगीत करणे किंवा नेमणुकीनंतर उमेदवारास कोणतेही कारण न देता व कोणतीही पुर्व सूचना न देता त्यास पदावरून कमी करण्याचा सर्वस्वी अधिकार जिल्हा विधी सेवा प्राधिकरणास राहील.

१७. एकत्रित वेतन हे किमान वेतन कायद्याअंतर्गत वर्धा मुख्यालयाकरीता लागु असलेले दरानुसार व वेळोवेळी मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे असेल.

१८. उपरोक्त पदाकरीता अर्ज करण्याकरीता अर्जदारांकडून कोणतेही शुल्क आकारल्या जाणार नाही.

१९. निवड प्रक्रियेच्या माहितीकरीता उमेदवाराने जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा यांचे अधिकृत संकेतस्थळ https://districts.ecourts.gov.in/wardha यावर भेट द्यावी.

२०. पुढील प्रक्रियेकरीता पात्र उमेदवारांची यादी जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा यांचे अधिकृत संकेतस्थळ https://districts.ecourts.gov.in/wardha व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वर्धा यांचे सूचना फलकावर प्रसिध्द केल्या जाईल.

२१. प्रक्रियेतील पात्र उमेदवारांना प्रत्यक्ष मुलाखतीबाबतचा संभाव्य दिवस/तारीख त्यांच्या दुरध्वनी क्रमांकावर/व्हॉट्सअ‍ॅपवर/ईमेलद्वारे/(https://rojgar.mahaswayam.gov.in/) महास्वयंम पोर्टलवर कळविण्यात येईल.

(हेमंत भ. गायकवाड)
अध्यक्ष,
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा
अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वर्धा

वर्धा
दिनांक :- ०८मे, २०२६.